प्रेस नोट ३२ दिनांक ०४/०९/२०२३

**बंदुकीने गोळी झाडून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणा-या इसमास मानखुर्द पोलीसांनी ताब्यात घेतलेबाबत**

मानखुर्द पोलीस ठाणे हद्‌दीत दिनांक ०३/०९/२०२३ रोजी रात्री कुर्ला स्क्रॅप, मंडाळा मानखुर्द या ठिकाणी मोकळया जागेवरून झालेल्या भांडणातून जीवे ठार मारण्याच्या उद्‌देशाने बंदुकीने गोळी झाडल्याने कलम ३०७, ३२३, ५०४, ५०६(२) भारतीय दंड संहिता सह कलम ३, २५, २७ शस्त्र अधिनियम १९५९ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाच्या तपासामध्ये मध्ये मुस्तकीन अहमद शेख, वय ५१ वर्षे, राहणार - कोपरखैराणे, नवी मुंबई यास तात्काळ विशेष पथकामार्फत अटक करण्यात आली आहे सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि संतोष शेलार करीत आहेत.

सदरचा गुन्हा मा.अप्पर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग, श्री. विनायक देशमुख, मा.पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ - ६, श्री हेमराजसिंह राजपूत, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त सो, देवनार विभाग, मुंबई श्री. संजय डहाके यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि श्री. महादेव कोळी, पोनि भांबल (गुन्हे), सपोनि संतोष शेलार व गुन्हे प्रकटीकरण पथक यांनी उघडकीस आणला.

--------------